ISBN - 978-81-926500-9-8

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचाराची सामाजिक परिवर्तनात भूमिका

प्रा. मडावी ए.डी. विभागप्रमुख अर्थशास्त्र विभाग,आदर्श महाविद्यालय, हिंगोली

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारताच्या इतिहासातील अशी एक व्यक्ती की ज्यांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, विविध अशा क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान राहिले आहे. ते एक उत्तम अर्थतज्ञ म्हणून प्रसिद्ध होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जे शोध निबंध लिहिलेत, त्या काळी जी भाषणे केली, वर्तमानपत्रातून जे लिखान केले, स्वतंत्र मजूर पक्षाचा जो जाहीरनामा मांडला आणि अर्थशास्त्रावरील जी पुस्तके लिहिली या सर्वांमध्ये त्यांचे आर्थिक विचार दिसून येतात. विदेशात शिक्षणाला जाण्यापूर्वी महाराज सयाजीराव गायकवाड यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विचारले की, "तुम्ही कोणत्या विषयाचे शिक्षण घेणार आहात?" यावर ते म्हणाले, "अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र या विषयामध्ये शिक्षण घेणार आहे." हे विषय निवडण्यामागील कारण सांगताना आंबेडकर म्हणतात की, "मला माझ्या समाजाची सेवा करायची आहे, त्यांचा विकास आणि उन्नती हे माझ्ये ध्येय आहे." या वाक्यावरून आपणाला लक्षात येईल देशाच्या विकासासाठी, समाजाच्या उन्नतीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनामध्ये किती तळमळ चालली होती.

इ.स.1915 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी एम.ए.ची पदवी अर्थशास्त्र विषयात कोलंबीया विद्यापीठातून संपादन केली तेंव्हा त्यांचे वय 24 वर्ष होते. त्यांना डी.एस्सी. ही पदवी 1923 मध्ये बॉनयुनिव्हर्सीटी जर्मनी येथून 'रूपयांची समस्या - उगम आणि उपाय' 'The problem of Ruppees : it origin & Solution'या प्रबंधामुळे प्राप्त झाली. त्यावेळी त्यांचे वय 32 वर्ष होते. नंतर हा ग्रंथ 1947 मध्ये 'हिस्टरी ऑफ इंडियन करन्सी ॲन्ड बँकींग' या नावाने प्रकाशित करण्यात आला. या वरून त्यांचे अर्थशास्त्रातील योगदान दिसून येतात. डॉ.आंबेडकर यांनी अर्थशास्त्रामध्ये फक्त संपत्ती व आर्थिक संबंधाचा अभ्यास न करता समाजाच्या कल्याणाचा देखील अभ्यास केला पाहिजे असे सांगितले आहे. देशातील संपत्तीचे विभाजन समाजामध्ये सारख्या प्रमाणात झाले पाहिजे असा विचार त्यांनी आपल्या लेखनातून मांडला आहे.

**समाजवाद व डॉ.आंबेडकर यांचे विचार:-**

खरे तर डॉ.आंबेडकर 1946 पर्यंत खाजगी अर्थव्यवस्था किंवा भांडवलशाही



ISBN - 978-81-926500-9-8

अर्थव्यवस्थेचे समर्थक होते. त्यांनी आर्थिक विकासातील सर्व भूमिका शेती व उद्योगातील खाजगी अर्थव्यवस्था गृहित धरून मांडल्या होत्या. परंतू नंतर मात्र भांडवलशाही व्यवस्था त्यांना मान्य नव्हती. याचे कारण असे सांगितले की भांडवलशाहीमध्ये भांडवलदारांकडून कामगार वर्ग आणि शेतमजूर यांचे मोठ्या प्रमाणात पिळवणूक व शोषण केल्या जाते. 1946 नंतर State and Minoritics मध्ये त्यांची भूमिका पूर्णपणे बदलली. भांडवलशाही व्यवस्थेच्या चौकटीत सामान्य जनांचे आर्थिक कल्याण होणार नाही म्हणून त्यांनी समाजवादी अर्थव्यवस्थेचा अंगीकार केला.

समाजाची आर्थिक रचना कशी असावी याचे स्पष्टीकरण करण्यासाठी डॉ.आंबेडकर यांनी समाजवादाची कल्पना मांडली. त्यांच्या मते समाजवाद किंवा समाजशाही अर्थव्यवस्था म्हणजे देशातील मुलभूत उद्योग व इतर उद्योगधंदे सरकारने चालविणे होय. जमिनीवर सरकारची मालकी असावी आणि सरकारने जातीचा किंवा पंथाचा विचार न करता ती देशातील लोकांना लागवडीसाठी द्यावी म्हणजे जमिनदार, भूमिहीन मजूर व कुळ असे वर्ग समाजात राहणार नाही. 1935 मध्ये भोपाळच्या अधिवेशनात डॉ.आंबेडकर यांनी बँक, विमा, आणि इतर पतपुरवठा संस्थाचे राष्ट्रीयकरण करण्यात यावे असे प्रतिपादन केले. ज्या देशात समाजवादी अर्थव्यवस्था नाही आणि प्रमुख उद्योगधंद्यांचे व शेतीचे राष्ट्रीयकरण होणार नाही तिथे आर्थिक समानता व न्याय कसा मिळेल? त्यासाठी समाजवादी अर्थव्यवस्थेची गरज आहे असे डॉ.आंबेडकर यांचे विचार होते.

**जलव्यवस्थापन व डॉ.आंबेडकरांची भूमिका:-**

जलसंपत्ती ही एक नैसर्गिक, निसर्गदत्त संपत्ती आहे. पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन केल्याशिवाय कृषीचा विकास होणार नाही. कृषीच्या विकासासाठी आवश्यक घटकापैकी पाणीपुरवठा हा एक महत्वाचा घटक आहे. पाणी हा घटक सर्वत्र सारख्या प्रमाणात उपलब्ध नाही. काही भागात, प्रदेशात, मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतो तर काही ठिकाणी पाण्याचा दुष्काळ पडतो. म्हणून जल व्यवस्थापन करणे अत्यंत महत्वपूर्ण ठरते. डॉ.आंबेडकर 1942 ते 1946 या दरम्यान व्हाईसरॉयच्या मंत्री मंडळात श्रममंत्री असतांना केंद्रिय जल आयोगाची स्थापना झाली होती. याच काळामध्ये हिराकुंड, दामोदर व सेन नद्यांवरील नदी - खोरे प्रकल्पाची सुरूवात झाली होती. या चार वर्षाच्या कालावधीत अखाल भारतीय जलधोरणाची पायाभारणी झाल्यामुळे जलसिंचन आणि विद्युत उर्जेची नेत्रदिपक प्रगती झाल्याचे दिसून येते.

ISBN - 978-81-926500-9-8

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली अनेक राज्यातून वाहणाऱ्या नद्यांचे प्रकल्प व त्यांचे व्यवस्थापन हे नदी खोरे प्राधीकरण किंवा महामंडळ स्थापन करून त्याब्यात दिले. यामध्ये केंद्र आणि राज्यसरकार या दोघांचा सहभाग होता. संपुर्ण नदी खोरे हा विकासाचा आधार मानून त्या करिता बहुउद्देशीय विकास प्रकल्प स्थापन करण्याची संकल्पना देखील त्यांचीच होती. जल अधिक असलेल्या क्षेत्रात नेहमी पूर येत असे व त्यापासून उद्भवणाऱ्या समस्यांना जनतेस सामोरे जावे लागते. त्यावेळी जल दुर्भिक्षाच्या क्षेत्रातील जनतेस नद्या जोड प्रकल्पाची मांडणी केली. नदी जोड प्रकल्पांमुळे सिंचन, नौकानयन, औद्योगिक आणि घरगुती वापरासाठी जलउर्जा विकसित करणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सतत प्रयत्नशिल होते.

**कृषीउत्पादकतेसंबंधी डॉ.आंबेडकरांचे विचार:-**

कृषी उत्पादकता म्हणजे कृषीची हेक्टरी उत्पादकता किंवा दर हेक्टर उत्पादन क्षमता होय. भारतीय कृषीची उत्पादकता आणि इतर देशाची कृषीची उत्पादकता यांची तूलना केल्यास विविध पिकांच्या बाबतीत भारतीय कृषीची उत्पादकता अत्यंत कमी असल्याचे दिसून येते.

**भारतीय शेतीच्या उत्पादकतेची तुलना (सन 2004-05)**

| तांदुळ (मेट्रिक टन) | | गहू (मेट्रिक टन) | | कापूस (मेट्रिक टन) | |
|---|---|---|---|---|---|
| देश | उत्पादकता | देश | उत्पादकता | देश | उत्पादकता |
| इजिप्त | 9.8 | इंग्लंड | 7.77 | चिन | 11.10 |
| अमेरिका | 7.23 | फ्रान्स | 7.58 | ब्राझील | 10.96 |
| कोरीया | 6.73 | चिन | 4.25 | अमेरिका | 9.58 |
| **भारत** | **2.9** | **भारत** | **2.71** | **भारत** | **4.64** |

**संदर्भ: Misra -Puri, Indian Economy 25th Revised Edition 2997, Page.316**

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, तांदुळ, गहू, कापुस या पिकांच्या बाबतीत निवडक देशांशी तुलना विचारात घेता भारतीय शेतीची दर हेक्टरी उत्पादकता कमी आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 1918 मध्ये 'The Journal of Indian Economic Society' च्या अंकामध्ये 'Small Holding in India and Their



ISBN - 978-81-926500-9-8

Remedics' हा लेख लिहिला या लेखामध्ये त्यांनी भारतीय शेतीच्या उत्पादकतेवर जमिनीच्या आकाराचा परिणाम होतो असे सांगितले आहे. भारतीय कृषीचा आकार तुकडीकरणामुळे लहान झाला आहे. त्यामुळे कृषीची उत्पादकता अत्यंत कमी आहे असे त्यांनी स्पष्ट केले. जमिनीचे एकत्रीकरण करून जमिनीचा आकार वाढविण्याची आवश्यकता आहे असे त्यांचे मत होते. कृषीचा आकार किफायतशीर होत नसेल तर त्याला कोर्टाने परवानगी नाकारावी व तसा सिव्हील प्रोसीजर कोडमध्ये सुधारणा व्हावी अशा प्रकारची महत्त्वपूर्ण सूचना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितली आहे.

जमिनीचा आकार मोठा असून जर त्याच्या जोडीला उत्पादनाची साधने नसतील तर जमिनीचा मोठा आकार सुद्धा फायदेशीर ठरणार नाही म्हणून त्यासाठी नांगरणी, पेरणी, कापणी, बि-बियाणे, किटक नाशके, पाणी यांचे प्रमाण वाढवावे लागेल. तरच भारतीय कृषीची उत्पादकता वाढेल असे विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले आहेत.

**चलनविषयक डॉ.आंबेडकरांचे विचार:-**

भारतीय चलन पद्धतीच्या उत्क्रांतीचा अभ्यास करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे पहिले भारतीय अर्थतज्ञ होते. जगामध्ये चलन पद्धतीचे जेवढे प्रकार होते तेवढे भारतात झाल्याचे दिसते. जसे द्विधातूकपद्धती, रौप्य परिमाण, सुवर्ण परिमाण, कागदी चलन पद्धती इत्यादी. पण भारतीयांना हवी असणारी चलन पद्धती मात्र ब्रिटिशांनी सुरू केली नाही. त्या काळात भारतीयांना सोन्याचे खुप आकर्षण होते म्हणून सोन्याची नाणे असणारी चलनपद्धती भारतात असावी असे लोकांना वाटत असे.

1920 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय चलनाच्या प्रश्नावर व्यावहारिक उपाय सुचविले आहेत. भारतामध्ये ब्रिटिश सरकारनी सुवर्णचलन परिणाम पद्धती चालू केली. त्या पद्धतीला डॉ.आंबेडकरांनी विरोध केला आणि त्यांनी असा विचार मांडला की सुवर्ण चलन विनिमय परिमाणात स्थिरता राहू शकत नाही आणि चलन निर्मितीवर कोणत्याही मर्यादा राहणार नाहीत. कारण गरजेपेक्षा चलनवाढ जास्त झाली तर देशामध्ये भाववाढीची समस्या निर्माण होईल व रूपयाची किंमत कमी होईल. परिणामी विनिमयाचे साधन म्हणून रूपयाचे स्थान अस्थिर होईल. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मर्यादित चलन निर्मितीच्या अधिकारावर अपरिवर्तनीय रूपया पद्धतीचा पुरस्कार केला. सुवर्ण अपरिवर्तनीय चलन परिमाण विशिष्ट मर्यादेत जर स्विकारले तर

ISBN - 978-81-926500-9-8

रूपयाची अंतर्गत खरेदी शक्ती सहजपणे सोन्याच्या परिणामाद्वारे स्थिर करता येईल. यामुळे वस्तूंच्या किंमती वाढणार नाही. भाववाढीच्या समस्येला सामोरे जावे लागणार नाही असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

**निष्कर्ष:-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, कोणत्याही आर्थिक समस्येची सोडवणूक करीत असतांना समाजातील गरीब व तळागाळातील लोकांचे हित त्यांच्या मनाच्या केंद्रस्थानी होते. देशाच्या विकासासाठी राजकीय लोकशाही प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी आर्थिक लोकशाहीची जोड असली पाहिजे असे डॉ.आंबेडकरांच्या विचारातून दिसून येते.

भारतामध्ये गरीब व श्रीमंतामधील दरी वाढत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत खाजगीकरणाचा मार्ग अवलंबील्या जात आहे. भाववाढीसारख्या समस्येला समोर जावे लागत आहे. भारतीय रूपयाचे मूल्य कमी होत असल्याचे दिसते. कृषीच्या कमी उत्पादकतेमुळे व पाणी पुरवठ्याच्या सोयीच्या अभावी भारतीय शेतकरी दारिद्र्यात जीवन जगत आहे. म्हणून आजही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार सामाजिक परिवर्तनात महत्वपूर्ण ठरणारे आहेत.

**संदर्भ :-**


1) प्रा.डॉ.बी.डी.इंगळे - आर्थिक विचारांचा इतिहास
2) धनंजय कीर - डॉ.बाबासाहेब आंबेडकर
3) प्रा.बी.वाय कुलकर्णी - भारतीय राजकीय विचारवंत
4) प्रा.डॉ.सुखदेव थोरात - डॉ.बाबासाहेब आंबेडकर जल व विद्युत विकास भूमिका व योगदान
5) डॉ.बाबासाहेब आंबेडकराचा आर्थशास्त्रीय दृष्टिकोन आणि चळवळीची दिशा, डॉ.बाबासाहेब वाङ्मयीन अभ्यास मंडळ इगतपूरी, जि.नाशिक
6) प्रा. यादव गायकवाड - भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन आणि कार्य, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. 2 ऑगस्ट 2007
7) डॉ.प्रभा कस्तुरे - वाडकर - पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत, अरूणा प्रकाशन, लातूर, 4 ऑगस्ट 2011